MHGO060007802024

# न्या य नि र्ण य

(दिनांक ०५/०५/२०२६ रोजी पारीत.)

या प्रकरणातील अभियोग पक्षाचे कथन व अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेला पुरावा लक्षात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ आहेत व त्या मुद्दयांवर मी खालील दिलेल्या कारणासाठी माझे निष्कर्ष नोंदवित आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १.दि.२९/०८/२०२४ रोजी १६.०० ते १७.०० वाजताच्या दरम्यान मौजा वडेगांव/रेल्वे, ता. अर्जुनी/मोरगांव जि. गोंदिया येथे परवाना नसतांना बेकायदेशीरपणे आरोपीच्या घरातुन १२ नग देशी दारुचे सिलबंद पव्वे प्रत्येकी ९० मिली क्षमतेने भरलेले मिळून आले, हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ... | **नाही.** |
| २. आदेश काय ? | ... | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

२. अभियोग पक्षाने आरोपीविरुद्ध दोषारोपीत करण्यात आलेला गुन्हा सिद्ध करण्याकरिता पंच सा.क्र.१ प्रमोद मनिराम मेश्राम व पंच सा. क्र. २ दादन हरीजी शहारे यांना तपासले आहे. पुरेशी संधी देवूनही अभियोग पक्ष फिर्यादी व तपासी अधिकारी यांना तपासण्यात अपयशी ठरले. त्यामुळे नि.१ वर आदेश पारीत करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. आरोपीविरूद्ध कोणताही पुरावा अभिलेखावर नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये आरोपीचे बयाण न नोंदविण्याचे आदेश नि.१ वर पारीत करण्यात आले. आरोपीने त्याच्या बाजूने कोणताही साक्षीदार तपासला नाही.

**मुद्दा क्र.१ करिता** :

३. पंच सा.क्र.१ प्रमोद मनिराम मेश्राम व पंच सा. क्र. २ दादन हरीजी शहारे यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की, पोलिसांनी त्यांना पंचनाम्यासाठी कुठेही बोलाविले नव्हते. पोलिसांनी त्यांची फक्त सही घेतली. सदर साक्षीदारांनी जप्ती पंचनाम्यावरील सही मान्य केली परंतु मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविलेली आहे. सदरचे साक्षीदार फितूर घोषीत करण्यात आले. विद्वान सरकारी अधिवक्ता यांनी सदर साक्षीदारांना विचारलेल्या उलट तपासणी सदृष्य प्रश्नांमधून देखिल अभियोग पक्षास कोणताही समर्थनीय पुरावा प्राप्त होवू शकला नाही. सबब, पंच साक्षीदारांच्या साक्षीचा फायदा सरकारी पक्षाला मिळू शकला नाही.

४. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीच्या घरातुन १२ नग देशी दारुचे पव्वे जप्त करण्यात आले. जप्त दारूपैकी एक ९० मिलीची शिशी नमुना म्हणुन काढुन रासायनिक तपासणीसाठी प्रादेशीक न्यायसहायक वैज्ञानीक प्रयोग शाळा, नागपुर येथे पाठविण्यात आले होते. त्याबाबत रासायनिक पृथक्करण अहवाल अभिलेखावर दाखल आहे.

५. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीच्या घरातुन मौका जप्ती पंचनाम्याप्रमाणे देशी दारू जप्त करण्यात आली. परंतु पंच साक्षीदार यांनी त्यांच्या कथनाला समर्थन दिले नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात रासायनिक पृथकरण अहवाल दाखल आहे. परंतु सदर प्रकरणात जप्त नमुना कोणाकडुन व कसा जप्त करण्यात आला तसेच जप्त करतांना त्यावर सील लावण्यात आले किंवा नाही याबाबत स्वतंत्र पुरावा अभिलेखावर आढळुन येत नाही. जप्त नमुना ज्या कर्मचाऱ्याने न्यायसहाय्यक प्रयोग शाळा येथे विश्लेषणाकामी नेला त्यांचा पुरावा अभियोगपक्षाने नोंदविला नाही. त्यामुळे जप्त नमुना सोबत कोणती छेडछाड झाली होती किंवा नाही किंवा त्यावर सील होते किंवा नाही हे स्पष्ट करणारा पुरावा अभियोगपक्षाने सादर केला नाही. या सर्व कारणांमुळे

आरोपीविरूध्द ठेवलेला आरोप संशयातीत शाबीत होत नाही. त्यामुळे आरोपी हे संशयाचा फायदा मिळविण्यास पात्र आहेत.

६. फौजदारी विधी तत्वानुसार संशयाच्या पलिकडे जावुन गुन्हा सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाची आहे. खटल्यात अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा समंजस संशयाच्या पलिकडे जावुन सिध्द केला नाही. तसेच रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर जरी दाखल केला तरीही आरोपीच्या घरातुन त्यातील द्रव्य जप्त झाले असा पुरावा नसल्याने सदर अहवाल उपयोगी ठरत नाही. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून असे स्पष्टपणे दिसुन येते की, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमचे कलम ६५(ई)७७(अ) अन्वये लागु होण्यासाठी आवश्यक असणारे घटक अभियोगपक्षाने संशयाच्या पलिकडे जावुन आरोपीविरूध्द सिध्द केले नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी सुरेंद्र देवदास नान्हे यांना महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई)७७(अ) अन्वये गुन्हा केलेल्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीने दिलेले जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल मिळकत १२ नग देशी दारुचे पव्वे प्रत्येकी ९० एमएल क्षमतेने भरलेले विल्हेवाटीसाठी अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग गोंदिया यांच्याकडे पाठविणेत यावा.

४. आरोपीने अपील दाखल झाल्यास अपील न्यायालयासमोर हजर राहील याकरीता त्याने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे अपील कालावधीपर्यंत रु.१५,०००/– किंमतीचा वैयक्तीक जातमुचलका सादर करावा.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

NEHA VIJAY SHAHU
Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.05.05 16:35:00 +0530

( एन.व्ही. साहू )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
अर्जुनी/मोरगांव.

अर्जुनी/मोरगांव.
दिनांक :०५.०५.२०२६